महाराष्ट्र विधानसभा
दिवसाच्या कामकाजाचा क्रम

मंगळवार, दिनांक २० नोव्हेंबर, २०१८
(सकाळी ११.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे-

(अ) तारांकित प्रश्न.

(ब) अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ४५७ ते ४७० सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

दोन : लोकलेखा समितीचा त्रेचाळीसावा अहवाल सभागृहास सादर करणे.

तीन : अध्यक्षांनी सभाध्यक्षांची तालिका नामनिर्देशित करणे.

चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).

पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :

(१) **सर्वश्री. अतुल भातखळकर, अबू आझमी, विजय वडेट्टीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, सुनिल केदार, अमर काळे, अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, ॲड. यशोमती ठाकूर, श्री डी.पी सावंत, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. बाळासाहेब थोरात, कुणाल पाटील, अब्दुल सत्तार, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री. अमित देशमुख, अमिन पटेल, मो.आरिफ नसीम खान, त्र्यंबकराव भिसे, जयंत पाटील, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, छगन भुजबळ, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे, जयदत्त क्षीरसागर, राणाजगजीतसिंह पाटील, हनुमंत डोळस, राहुल मोटे, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री संदीप नाईक, हसन मुश्रीफ, भास्कर जाधव, वैभव पिचड, पांडुरंग बरोरा, राहुल जगताप, दत्तात्रय भरणे, दिपक चव्हाण, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. पंकज भुजबळ, नरहरी झिरवाळ, सुरेश लाड, विजय भांबळे, संजय कदम, बाळासाहेब पाटील, मकरंद जाधव-पाटील, भाऊसाहेब पाटील -चिकटगांवकर, डॉ मधुसूदन केंद्रे, सर्वश्री. बबनराव शिंदे, दिलीप सोपल, शिवेंद्रसिंहराजे भोसले, मनोहरराव नाईक, संग्राम जगताप, सर्वश्रीमती सुमन पाटील, ज्योती कलानी, सर्वश्री अवधूत तटकरे, प्रदीप जाधव-नाईक, श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर, डॉ. राहुल पाटील, श्री अजय चौधरी, श्रीमती तृप्ती सावंत, सर्वश्री. सुरेश धानोरकर, रणधीर सावरकर, मंगेश**

कुडाळकर, सुनिल शिंदे वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वनमंत्र्याचे लक्ष वेधतील :-

"यवतमाळ जिल्ह्यातील नरभक्षक अवनी (टी-१) वाघिणीला जेरबंद करण्याचा अथवा इतर मार्गाने पकडण्याचे प्रयत्न न करता बंदुकीने गोळी झाडून ठार मारल्याची घटना दिनांक २ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, पशुवैद्यकीय तज्ञांनी अवनीचे शवविच्छेदन केल्यानंतर त्यांनी दिलेल्या अहवालात अवनीच्या शरीरात घुसलेल्या गोळ्यांची दिशा पाहता ती जीव वाचविण्यासाठी दूर पळून जात असतांना तिच्यावर गोळ्या झाडल्यात आल्याचे नमूद केलेले असणे, अवनी वाघिणीला बेशुद्ध करण्याची पद्धत चुकली असून बेशुद्धीसाठी दिलेले इंजेक्शन तिच्या स्नायूत गेले नसल्याचेही शवविच्छेदनाच्या अहवालातून निदर्शनास येणे, शिकारी असगर अलीने व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाचा नियम मोडल्याचे निदर्शनास येणे, सदर विषयी संबंधित कर्मचारी व अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी यासाठी होत असलेली मागणी, चंद्रपूर जिल्हयातील चांदाफोर्ट-गोंदिया रेल्वेमार्गावर रेल्वेच्या धडकेत एकाच वेळी वाघाच्या तीन बछडयांचा मुत्यू झाला असल्याची घटना दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, ही घटना वनविकास महामंडळाच्या हद्दीतील लोहारा ते चिचपल्ली दरम्यान मामला वन परिक्षेत्रातील कक्ष क्रमांक ४१० मध्ये घडल्याचे उघडकीस येणे, या बछडयासोबत असलेली वाघीण ती पुढे रेल्वे रुळ ओलांडून निघून गेल्याने बचावली असणे, यवतमाळ जिल्हयातील टि-१ अवनी वाघीण आणि तिच्या दोन बछडयाचे प्रकरण गाजत असतांनाच चंद्रपूर जिल्हयात तीन बछडयांचा झालेल्या मृत्यूमूळे वनविभागात खळबळ माजणे, राज्यात गेल्या काही वर्षात वाघांचा होत असलेला मृत्यू, वन्य प्राण्यांचे संरक्षण व संवर्धन करण्याऐवजी अवनी या वाघिणीची हत्या झाल्याने जनमानसात पसरलेले वाढते संशयाचे वातावरण, शासनाने या संपूर्ण घटनेची पारदर्शक चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. सुनिल शिंदे, अमित देशमुख, राधाकृष्ण विखे-पाटील, बाळासाहेब थोरात, अमिन पटेल, अस्लम शेख, त्र्यंबकराव भिसे, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. मो. आरिफ नसीम खान, डॉ. संतोष टारफे, श्री कुणाल पाटील, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. अबू आझमी, राजन साळवी, हर्षवर्धन सपकाळ, विजय वडेट्टीवार, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री अमित झनक, राहुल बोंद्रे, सुनिल केदार, अमर काळे, अब्दुल सत्तार, डी.पी.सावंत, पृथ्वीराज चव्हाण, श्रीमती अमिता चव्हाण, श्री. वसंतराव चव्हाण, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री. जितेंद्र आव्हाड, जयकुमार गोरे, सुधाकर कोहळे, सुधाकर देशमुख, डॉ. मिलिंद माने, सर्वश्री. विकास कुंभारे, कृष्णा खोपडे, छगन भुजबळ, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, कालीदास**

कोळंबकर, वि.स.स तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-

"राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येणे, या योजनेंतर्गत ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क मिळून ५० टक्के रक्कम राज्य शासनाकडून देण्यात येणे, अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यावर पहिल्या शैक्षणिक वर्षी ठरलेले शुल्कच पुढील सर्व शैक्षणिक वर्षात कायम राहत असल्याने या योजनेंतर्गत होणारी प्रतिपूर्तीची रक्कम प्रत्येक शैक्षणिक वर्षात समान असणे, या योजनेच्या राज्यातील लाभार्थी विद्यार्थ्यांना पहिल्या दोन वर्षी व्यवस्थित शिष्यवृत्ती रकमेची प्रतीपुर्ती झालेली असणे, परंतु सन २०१७ – २०१८ या शैक्षणिक वर्षांत विद्यार्थ्यांना मिळालेली रक्कम आणि अपेक्षित रक्कम यांच्यात तफावत आढळून आलेली असणे, या योजनेच्या प्रत्येक लाभार्थी विद्यार्थ्याला अपेक्षित रक्कमेपेक्षा दोन ते तीन हजार रुपयांची रक्कम कमी प्राप्त झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१८ मध्ये उघडकीस येणे, परिणामी याचा फटका राज्यातील हजारो लाभार्थी विद्यार्थ्यांना बसलेला असणे, सदर प्रकरणी वारंवार दाद मागूनही त्याची दखल महाविद्यालय आणि तंत्र शिक्षण संचालनालयाने घेतलेली नसणे, परिणामी या योजनेच्या लाभार्थी विद्यार्थ्यांत पसरलेले चिंतेचे वातावरण, त्यामुळे सदर प्रकरणाची तातडीने चौकशी करून या योजनेच्या लाभार्थी विद्यार्थ्यांना तफावतीची रक्कम अदा करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री. हर्षवर्धन सपकाळ, अमिन पटेल, अस्लम शेख, डॉ. संतोष टारफे, श्री.सुनिल शिंदे, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री. सुनिल प्रभू, मंगेश कुडाळकर, भरतशेठ गोगावले, राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री. राहुल बोंद्रे, अमित झनक, संदिपानराव भुमरे, सुरेश धानोरकर, मो. आरिफ नसीम खान, अमित देशमुख, त्र्यंबकराव भिसे, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. सुनिल केदार, अमर काळे, संग्राम थोपटे, अब्दुल सत्तार, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. सुभाष उर्फ पंडीतशेठ पाटील, सुरेश गोरे, जयंत पाटील, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, छगन भुजबळ, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे, जयदत्त क्षीरसागर, राणाजगजीतसिंह पाटील, हनुमंत डोळस, राहुल मोटे, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. संदीप नाईक, हसन मुश्रीफ, भास्कर जाधव, वैभव पिचड, पांडुरंग बरोरा, राहुल जगताप, दत्तात्रय भरणे, दिपक चव्हाण, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. पंकज भुजबळ, नरहरी झिरवाळ, सुरेश लाड, विजय भांबळे, संजय कदम, बाळासाहेब पाटील, मकरंद जाधव-पाटील, भाऊसाहेब पाटील -चिकटगांवकर, डॉ मधुसूदन केंद्रे, सर्वश्री. दिलीप सोपल, शिवेंद्रसिंहराजे भोसले,**

मनोहर नाईक, संग्राम जगताप, श्रीमती ज्योती कलानी, सर्वश्री अवधूत तटकरे, प्रदीप जाधव-नाईक, श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर, किसन कथोरे, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री. सुभाष भोईर, संजय पोतनीस, डॉ. संजय रायमुलकर, श्रीमती तृप्ती सावंत, सर्वश्री. पृथ्वीराज चव्हाण, कालीदास कोळंबकर, डी.पी.सावंत, कुणाल पाटील, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री. शेख आसिफ शेख रशीद, जयकुमार गोरे, अबू आझमी, विश्वजित कदम, सुधाकर कोहळे, सुधाकर देशमुख, डॉ. मिलिंद माने, सर्वश्री. कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, भारत भालके, बसवराज पाटील, नितेश राणे, भाऊसाहेब कांबळे, मधुकरराव चव्हाण, योगेश सागर, डॉ. सुजित मिणचेकर, श्री.उल्हास पाटील, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री. प्रकाश फातर्पेकर, तुकाराम काते, डॉ.शशिकांत खेडेकर, सर्वश्री किशोर पाटील, अनिल कदम, प्रतापराव पाटील-चिखलीकर, श्रीमती अमिता चव्हाण, कु. प्रणिती शिंदे, श्री. सिध्दाराम म्हेत्रे, ॲड राहुल कुल, सर्वश्री शरद सोनावणे, महेश लांडगे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-

''राज्यभरात स्वाइन फ्लू आणि डेंग्युने मोठया प्रमाणावर थैमान घालण्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, माहे जानेवारी ते ऑक्टोबर दरम्यान सुमारे २०० हुन अधिक नागरिकांचा स्वाइनफ्लूमुळे मृत्यू होणे तर १,५०० हुन अधिक नागरिकांना स्वाइन फ्लूची लागण होणे, यातील २०० हुन अधिक रूग्ण व्हेंटीलेटरवर असणे, एकटया मुंबई शहरात २५० हुन अधिक डेंग्युचे रूग्ण आढळून येणे, तर २,५०० हुन अधिक रूग्णांमध्ये डेंग्युसदृश्य लक्षणे आढळून येणे, राजभवन येथील ४२ वर्षीय सुचिता शिंदे या महिला अधिकाऱ्याचा डेंग्युने मृत्यु होणे, मुंबईत दिनांक १४ ऑक्टोबर, २०१८ रोजी पर्यंत ८,७०० रुग्णांना मलेरिया होणे, त्यापैकी ६ जणांना मलेरियामुळे प्राण गमवावे लागणे, राज्यातही गतवर्षी १७,७१० जणांना मलेरिया होऊन २० जण दगावल्याची माहिती सरकारी आकडेवारीतून उपलब्ध होणे, आगामी काळात स्वाइन फ्लू, डेंग्यु, लेप्टो, मलेरीया यासारख्या साथीच्या आजारांचा मोठया प्रमाणात फैलाव होण्याची भिती आरोग्य विभागाकडून व्यक्त करण्यात येणे, सदरहू डेंग्यु, मलेरिया, स्वाइन फ्लूचा वाढता प्रसार रोखण्यासाठी राज्य शासन व महापालिका मिळून समन्वयाने तातडीने उपाय योजना करण्याची गरज असणे, मुंबईसह राज्यात सततच्या पसरणाऱ्या साथीच्या रोगांवर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने विशेष मोहीम राबवून रोगनियंत्रण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रीया."

सहा : शासकीय विधेयके :

(अ) पुर:स्थापनार्थ :-

(१) सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१८.

(२) सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६७ - भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८.

(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-

(१) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री. अमिन पटेल, जयंत पाटील, छगन भुजबळ, अजित पवार, दिलीप वळसे पाटील, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, भारत भालके, जयदत्त क्षीरसागर, बाळासाहेब पाटील, हनुमंत डोळस, विजय भांबळे, पंकज भुजबळ, राणाजगजितसिंह पाटील, श्रीमती. दिपीका चव्हाण, श्री. सुरेश लाड, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. हसन मुश्रीफ, दिपक चव्हाण, वैभव पिचड, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-

"ही विधानसभा सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २० — मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१८ नापसंत करते."

(ख) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६३ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६३ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमिन पटेल, अमर काळे, सुनिल केदार, डी.पी.सावंत, श्रीमती निर्मला गावीत, डॉ. संतोष टारफे, श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६३ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, छगन भुजबळ, शशिकांत शिंदे, जयदत्त क्षीरसागर, जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६३ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६३ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अमित झनक, प्रा.वीरेंद्र जगताप, श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६३ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती

घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(२) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री. अमिन पटेल, जयंत पाटील, छगन भुजबळ, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, हर्षवर्धन सपकाळ, भारत भालके, राधाकृष्ण विखे पाटील, बाळासाहेब पाटील, हनुमंत डोळस, विजय भांबळे, पंकज भुजबळ, श्रीमती दिपिका चव्हाण, श्री.सुरेश लाड, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री.हसन मुश्रीफ, दिपक चव्हाण, वैभव पिचड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २४ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (तिसरी सुधारणा) अध्यादेश, २०१८ नापसंत करते."

(ख) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमिन पटेल, अमर काळे, सुनिल केदार, डी.पी.सावंत, श्रीमती निर्मला गावीत, डॉ. संतोष टारफे, श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, छगन भुजबळ, शशिकांत शिंदे, जयदत्त क्षीरसागर, जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अमित झनक, प्रा.वीरेंद्र जगताप, श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

सात : **डॉ. अनिल बोंडे, सर्वश्री सुनिल प्रभू, राजेंद्र पाटणी, सुभाष साबणे, प्रशांत बंब, डॉ. जयप्रकाश मुंदडा, श्री. बाबुराव पाचर्णे, डॉ. संजय रायमुलकर, डॉ. संजय कुटे, सर्वश्री. सुरेश धानोरकर, सुरेश खाडे, राजाभाऊ वाजे, पास्कल धनारे, किशोर पाटील, अनिल गोटे, राजेश क्षीरसागर, संजय सावकारे, प्रकाश आबिटकर, उदेसिंग पाडवी, मनोहर भोईर, विजयकुमार गावित, राहुल पाटील, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री ज्ञानराज चौगुले, शिवाजीराव कर्डिले, योगेश घोलप, संतोष दानवे, डॉ. शशिकांत खेडेकर, सर्वश्री अतुल सावे, अनिल कदम, प्रा. संगिता ठोंबरे, सर्वश्री. वैभव नाईक, सुधाकर भालेराव, उल्हास पाटील, हरिष पिंपळे, अनिल बाबर, गोवर्धन शर्मा, शंभुराज देसाई, चैनसुख**

संचेती, प्रा. चंद्रकांत सोनवणे, सर्वश्री.लखन मलिक, प्रतापराव पाटील-चिखलीकर, रमेश बुंदिले, हेमंत पाटील, किर्तीकुमार भांगडिया, नाना शामकुळे, सुधाकर देशमुख, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री. धनंजय उर्फ सुधीर गाडगीळ, उन्मेश पाटील, बाळासाहेब सानप, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री रणधीर सावरकर, राजू तोडसाम, प्रा. डॉ. अशोक उईके, सर्वश्री. समीर कुणावार, समीर मेघे, डॉ. देवराव होळी, सर्वश्री तान्हाजी मुटकुळे, लक्ष्मण जगताप, ॲड. राहुल कुल, सर्वश्री. मोहन फड, विनायकराव जाधव-पाटील, डॉ. मिलिंद माने, श्री. सुरेश भोळे, श्रीमती स्नेहलता कोल्हे, ॲङ आकाश फुंडकर, श्रीमती मोनिका राजळे, श्री.राजेंद्र नजरधने, ॲङ लक्ष्मण पवार, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री संजय भेगडे, अमल महाडिक, शिवाजीराव नाईक, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-

"सन २०१८ च्या खरीप हंगामामध्ये राज्यातील २६ जिल्हयांमध्ये गंभीर दुष्काळ व ११२ तालुक्यामध्ये मध्यम दुष्काळ दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ पासून राज्य शासनाने घोषित केला असणे, दुष्काळाचे नैसर्गिक संकट दूर करण्याच्या दृष्टीने व दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना सोयी-सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याकरिता राज्य शासनाकडून मंत्रीमंडळ उपसमिती नेमण्यात आली असणे, मा. मुख्यमंत्री व मंत्रीमंडळातील त्यांच्या अनेक सहकारी मंत्र्यांनी दुष्काळी भागाचा दौरा करुन व स्थानिक प्रशासनाकडून तेथील नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांची प्रत्यक्ष पाहणी करुन दुष्काळाचा सामना युध्दपातळीवर करण्याच्या दृष्टीने प्रशासनास दुष्काळ निवारण्याची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याकरिता आदेश देण्यात आले असणे, दुष्काळ निवारण्याकरिता केंद्राकडून आर्थिक मदत मिळविण्याचे शासनाचे प्रयत्न असणे, केंद्राच्या 'नॅशनल सेंटर फॉर क्रॉप फोरकास्टींग' या संस्थेकडून राज्यातील सर्व गावांतील पाण्याची सद्यस्थिती, पाण्याची पातळी, पिकांची परिस्थिती इत्यादी सर्व बाबींचे उपग्रहाच्या माध्यमातून सर्वेक्षण करुन त्याप्रमाणे दुष्काळ निवारण्याचे कार्य कार्यान्वित करण्यात आले असणे, राज्यातील २० हजार गावांमध्ये पिकांची आणेवारी सरासरी ५० पैशांपेक्षा कमी असून सुमारे २०० तालुक्यांवर दुष्काळाचे सावट असणे, विशेषत: मराठवाडयात अत्यल्प पाऊस झाल्याने मराठवाडयातील ८ हजार ५२५ गावांपैकी ३ हजार ५७७ म्हणजे ४२% गावांची आणेवारी ५० पैशांपेक्षा कमी असणे, शासनाव्दारे मराठवाडयातील दुष्काळी पट्टयासाठी सुमारे ८ हजार कोटी रुपये खर्च करण्यात येणे, मराठवाडयात जलयुक्त शिवाराची कामे मोठया प्रमाणावर होऊनही त्या भागात पाऊस न झाल्याने व त्यामुळे जलयुक्त शिवारामध्ये पाणी जमा होऊ न शकल्याने त्या भागात पाण्याची भीषण समस्या निर्माण होणे, राज्याच्या विविध भागातील पर्जन्यमान, पीक परिस्थिती, भूजल पातळी आदींची माहिती एकत्रित करुन त्यांचे विश्लेषण करण्यासाठी व त्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाकडून 'महामदत' या संकेतस्थळाची निर्मिती करण्यात येणे, राज्यातील आत्महत्याग्रस्त दुष्काळी जिल्हयांकरिता नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेंतर्गत ३०० कोटींच्या वार्षिक कृती आराखडयास

प्रशासकीय मंजुरी देण्यात येऊन तो कार्यान्वित केला असणे, या प्रकल्पांतर्गत मराठवाडा व विदर्भातील क्षारयुक्त जमीन असणाऱ्या गावांमध्ये शेतकऱ्यांचे कृषी उत्पन्न वाढविण्यासाठी आणि गावातील जमिनीचे मृद संवर्धन करण्यासाठी नियोजन करण्यात येणे, दुष्काळ जाहीर झालेल्या तालुक्यामध्ये जमीन महसुलातून सुट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेती निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषीपंपाच्या चालू बिलामध्ये ३३.५% सुट, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी, एस.टी. प्रवास सवलत, रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकरचा वापर व टंचाई जाहीर झालेल्या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या शेतपंपाची विज जोडणी खंडित न करणे इ. बाबी राज्य शासनाकडून जाहीर झाल्या असणे, नैसर्गिक असमतोलपणामुळे राज्यात निर्माण होणाऱ्या दुष्काळावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी व शेतकऱ्यांना कर्ज घेण्याची आवश्यकता न पडता त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी शासनाकडून दुरगामी धोरण आखण्यात येणे, जलयुक्त शिवाराची संकल्पना अंमलात आणून राज्यातील बहुतांश भागातील पाण्याचे दुर्भिक्ष कमी करण्याचा शासनाचा प्रयत्न, दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना अधिकाधिक सोयी-सुविधा देण्याच्या दृष्टीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी.''

आठ : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-

(१) **श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.**

"**खडकवासला (ता.हवेली, जि.पुणे) शिवणे ते नांदेड सिटीला जोडणारा नदीवरील पुल धोकादायक झाल्याबाबत**" या विषयावरील **श्री.भिमराव तापकीर, वि.स.स** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ११६६१९ ला दिनांक ११ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(२) **श्री. राहुल कुल वि.स.स.**

"**दौंड (जि.पुणे) तालुक्यातील अंगणवाडी बांधकामासाठी निधी मिळण्याबाबत**" या विषयावरील **श्री.राहुल कूल व इतर वि.स.स** यांचा दिनांक २० जुलै, २०१८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ४५५ मधील प्रश्न क्रमांक ११५२१८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : १९ नोव्हेंबर, २०१८

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.